MHPU180013342017

नि. दिवाणी दावा क्र. २३७/२०२७
दत्तात्रय व इतर
विरुध्द
देवईबाई व इतर

<u>निशाणी क्र. ३५ वर आदेश</u>
(पारीत दिनांक २२/०८/२०२४)

सदरचा अर्ज वादी यांनी आदेशीका क्र. ६ नियम १७ दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे दुरुस्ती करीता दाखल केलेला आहे.

२. वादी यांच्या म्हणण्यानुसार प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांच्या विरुध्द अतिक्रमण काढून मिळण्याकरीता व निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. दावा दाखल करते वेळी वादी क्र. २ व वादी क्र. ३ यांच्या वडिलांचे नावामध्ये चुक झाली असून त्याबाबत त्यांना दुरुस्ती करावयाची आहे. तसेच दाव्याचे कामकाज चालू असताना प्रतिवादी क्र. २३ यांनी दिनांक २७/१२/२०१७ रोजी दस्त क्र. ४८३५/२०१७ अन्वये खरेदीखत करुन दिले असल्याने आवश्यक पक्षकार म्हणून खरेदी घेतलेल्या व्यक्तींना दाव्यात सामील करणे गरजेचे आहे. प्रस्तुतचा दावा गुणदोषावर चालण्याकरीता वर नमूद केलेली दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. सदर दुरुस्तीमुळे वाद विषयात अमुलाग्र बदल होत नाही तसेच दाव्याचे कारण देखील बदलत नाहीत. तसेच प्रतिवादी यांचे जबाबास कोणतीही बाधा येत नसल्याने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याबाबत विनंती वादी यांनी केली आहे.

३. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या वकीलांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले व प्रस्तुत अर्जातील मजकूर नाकारला. त्यांच्या म्हणण्यानुसार प्रस्तुतचा दावा सन २०१७ मध्ये दाखल केलेला असून सात वर्षांच्या प्रदिर्घ कालावधीनंतर सदरचा अर्ज दाखल करणे हे संयुक्तीक नाही. त्यामुळे त्यांनी प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली. इतर प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही.

४. अर्जाचे व दाखल केलेल्या म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र. २ व ३ यांच्या वडिलांचे नावामध्ये दावा दाखल करते वेळी चुक झाली असून प्रतिवादी क्र. २३ यांनी दावा चालू

असताना दावा मिळकत त्रयस्त व्यक्तींना विक्री केली आहे. त्यामुळे वादी हे प्रतिवादी क्र. २ ते ३ यांच्या नावा मध्ये दुरुस्ती बरोबरच वाद मिळकत विकत घेतलेल्या व्यक्तीना दाव्यामध्ये समाविष्ट करु इच्छीतात. प्रस्तूत प्रकरण हे स्थावर मिळकतीबाबत असून ते गुणदोषावर निश्चीत होणे गरजेचे आहे. तसेच प्रतिवादी क्र. २३ यांनी विक्री केलेल्या व्यक्तीना दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार म्हणून समाविष्ट करणे गरजेचे आहे. प्रस्तूत दुरुस्ती मुळे दाव्याचे स्वरुप बदलणार नाही किंबहुना दाव्याचा निकाल न्यायोचित दृष्टीकोनातून देण्यामध्ये मदत होणार आहे. परंतु, प्रस्तुतकामी वादी यांनी केलेला विलंब विचारात घेता प्रतिवादी क्र. १ ते ९ यांना भरपाई देणे गरजेचे आहे. म्हणून मी पुढील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

<u>आदेश</u>

१. वादी यांचा अर्ज रक्कम रुपये १०००/– (रुपये एक हजार फक्त) खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र.१ ते ९ यांना दिल्यानंतर अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती १४ दिवसात करावी.

Digitally signed by KALDATE SHARAD BALBHIM
Date: 2024.08.26 12:49:44 +0530

दिनांक- २२/०८/२०२४.

**(शरद ब. काळदाते )**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश,
क. स्तर, दौंड,जि. पुणे.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F file, Order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | :- | Deepak A. Merukar, Grade-3 |
| Court / Panel | :- | (Sharad B. Kaldate)<br>2nd Jt. C.J.J.D. & Judicial Magistrate First Class (Court No. 2) Daund. |
| Order / Judgment date | :- | 22/08/2024. |
| Order / Judgment singed by the Presiding Officer on | :- | 22/08/2024. |
| Order/ Judgment uploaded on | :- | 26/08/2024. |